सन्मान

# ‘शिवपार्वती प्रतिष्ठान’तर्फे डॉ. बी.बी. पवार यांचा गौरव



श्रुतिसागर आश्रमाच्या स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना डॉ.श्री. बी.बी. पवार. समवेत डॉ. मो.स. गोसावी, प.पू. रंगाकाका कुलकर्णी.

नाशिक : ‘पूर्वा कृषिदूत’ मासिकाचे संस्थापक संपादक, तसेच राहुरीच्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे माजी कुलसचिव डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांना नुकताच ‘शिवपार्वती प्रतिष्ठान’चा ‘सर डॉ. मो.स. उपाख्य अप्पासाहेब गोसावी लोकसेवक’ पुरस्कार प्रदान करण्यात आला. मा.श्री. अण्णासाहेबांची अध्यापनाची प्रदीर्घ कारकीर्द, कुशल विद्यापीठीय प्रशासन यांसह सामाजिक बांधिलकी जपून केलेले कृषि-जनप्रबोधनात्मक लेखन या सन्मानासाठी प्राधान्याने विचारात घेण्यात आले. अध्यात्म आणि त्या अनुषंगाने येणारी लोकाभिमुखता आपल्या आचरणाच्या केंद्रस्थानी राहिली. प्रस्तुत सत्कार ही त्याचीच फलश्रुती असल्याची विनम्र भावना मा.श्री. अण्णासाहेब यांनी या संदर्भात बोलताना व्यक्त केली.

पुण्यश्लोक मातोश्री पार्वतीबाई गोसावी यांच्या ४५ व्या स्मृतिदिनानिमित्त, गंगापूर रोड येथील कुर्तकोटी सभागृहात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रतिष्ठानचे विश्वस्त या नात्याने सर डॉ. मो.स. गोसावी यांनी उपस्थितांचे स्वागत केले व प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेतला. यावेळी मनोगत व्यक्त करताना डॉ. गोसावी म्हणाले की, आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे या माध्यमातून विविध उपक्रम राबविणे शक्य झाले आहे. संस्कारातील मानव्य ही जगाला लाभलेली सर्वश्रेष्ठ देणगी आहे. संस्कार, प्रेम व आदरभाव समाजात वृद्धिंगत झाला पाहिजे, तसेच शिक्षणाला अध्यात्माची जोड असावी, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. एस.एम.आर.के. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.सौ. दीप्ती देशपांडे, श्री. कल्पेश गोसावी, श्री. शैलेश गोसावी, श्री. प्रदीप देशपांडे आदी मान्यवर व्यासपीठावर होते.

यावेळी पुण्यश्लोक सद्गुरू शिवपार्वती आध्यात्मिक पुरस्कार भालोद- भरूच येथील प.पू. शरदच्चंद्र प्रतापे महाराज यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याचप्रमाणे श्रीराम पराडकर वैदिक पुरस्कार प.पू. रंगाकाका कुलकर्णी महाराज यांना तर नंदलाल जोशी वेदवेदांग पुरस्कार वे.मू. कौस्तुभशास्त्री पाटणकर यांना प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमात सेवाव्रती अनुबंधी नाथ दाम्पत्यांचाही गौरव झाला. मंगला व मोहिनीराज कुलकर्णी, स्मिता व मिलिंद काटेकर, अंजली व सतीश कुलकर्णी, धनश्री व भूषण मटकरी, रेवती व जयंतराव कुलकर्णी यांचा त्यांमध्ये समावेश होता. डॉ. सुनंदा गोसावी संगीतरत्न पुरस्कार प्रसिद्ध शास्त्रीय गायिका मंजिरी असनारे- केळकर यांना प्रदान करण्यात आला. आदर्श संस्था पुरस्कार नाशिक येथील श्रीमती गार्डा बालसदन संस्थेला देण्यात आला.

याप्रसंगी कृष्णा दरवडे, अक्षता मुंडे, ईश्वरी जाधव, सोनिया कुटे, सृष्टी रामपुरे, इशिता छाजेड या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच गुणवंत विद्यार्थिनी क्षितिजा शेवनकर, मानसी सागर, सायली वाणी यांनाही गौरविण्यात आले. तसेच श्री. लक्ष्मीकांत जोशी, श्री. मुकुंद येवलेकर, श्री. दीपक कुलकर्णी, श्री. प्रमोद भार्गवे, प्रा. छाया लोखंडे, प्रा. मनीषा बागूल या ज्येष्ठ सहयोगींचाही सन्मान झाला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. जोशी यांनी केले. यानंतर फुलगाव (पुणे) येथील श्रुतिसागर आश्रमाच्या स्वामिनी स्थितप्रज्ञानंद सरस्वती यांनी ‘एकनाथी भागवताचे आधुनिक जीवनात योगदान’ या विषयावरील व्याख्यानमालेचे चौथे पुष्प गुंफले. या कार्यक्रमाला नाशिककर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ■